भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.
दिनांक:- ०४/०३/२०१९

- प्रेसनोट -

पाच वर्षापासुन अपहरन व खंडणीच्या गुन्हयातील फरारी आरोपी अटक.

---

दिंनाक.०२/०३/२०१९ रोजी भारती विदयापीठ पोलीस स्टेशनच्या हददीत पोलीस सहा.पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी व तपास पथकातील कर्मचारी हे पेट्रोलिंग करित असताना पाच वर्षापासुन भारती विदयापिठ पोलीस स्टेशन, गु.रजि.क्र. ४९८/२०१४, भा.द.वि. कलम ३६३,३६४(अ), ३८७,५०७,३२३,५०४,३४ अपहरन व खंडणीच्या गुन्हयातील फरारी असणारा आरोपीत गणेश सुर्यभान सातपुते, हा बालाजीनगर धनकवडी पुणे येथे येणार असल्याबाबतची गुप्त बातमी पोलीस शिपाई गणेश चिंचकर व पोलीस शिपाई अभिजीत जाधव यांना प्राप्त झाली होती. मिळालेल्या बातमीप्रमाणे बालाजीनगर धनकवडी येथे सहा. पोलीस निरिक्षक श्रीशैल चिवडशेटटी, पोलीस शिपाई गणेश चिंचंकर, पोलीस शिपाई अभिजीत जाधव असे जावुन त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव पत्ता गणेश सुर्यभान सातपुते, वय ३७ वर्षे, रा. श्री तुलसी हर्बल स्टोअर, शॉप नं. १९, नानक निवास, बालाजीनगर, धनकवडी पुणे असे सांगितले. तेव्हा त्यास पोलीस ठाणेस आणुन त्याच्याकडे गुन्हा केल्याबाबत तपास केला असता त्यांने गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. तेव्हा त्यास दि.०२/०३/२०१९ रोजी अटक करण्यात आली आहे. त्यास मा. न्यायालयाच्या समक्ष हजर करुन त्याची मा. न्यायालयाकडुन पोलीस कस्टडी रिमांड घेवुन त्याच्याकडे अधिक तपास करित आहोत.

सदर कामगिरी अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे मा.श्री रविंद्र सेनगावकर, परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री बच्चनसिंग, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री रविंद्र रसाळ यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विष्णु पवार, पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री विष्णु ताम्हाणे, तसेच तपास पथकाचे सहा. पोलीस निरिक्षक श्रीशैल चिवडशेटटी, पोलीस कर्मचारी गणेश चिंचंकर, अभिजीत जाधव, अभिजीत रत्नपारखी, महेश मंडलीक, कृष्णा बढे, कुंदन शिदे, सचिन पवार, राहुल तांबे, सर्फराज देशमुख, यांनी केलेली आहे.

भारती विदयापीठ पोलीस स्टेशन ★ पुणे ★

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.